अक्षय कथा

मोहिनी, कन्याकुमारी, सुभद्रा



दुर्गा भागवत

मोहिनी कन्याकुमारी सुभद्रा

लेखिका
दुर्गा भागवत

ओरिएंट लाँगमन

ओरिएंट लाँगमन लिमिटेड

रजिस्टर्ड कार्यालय

३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९

इतर कार्यालये

कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

१७ चित्तरंजन ॲव्हेन्यू, कलकत्ता ७०० ०७२

१६० अण्णा सलाई, मद्रास ६०० ००२

१/२४ असफअली मार्ग, नवी दिल्ली ११० ००२

८०/१ महात्मा गांधी मार्ग, बंगळूर ५६० ००१

३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९

सिटी सेंटर अशोक, गोविंद मित्रा मार्ग, पाटणा ८०० ००४

हाऊस नं २८/३१, १५ अशोक मार्ग, लखनौ २२६ ००१

एस. सी. गोस्वामी मार्ग, पानबझार, गुवाहाटी ७८१ ००१

३६५, शहीद नगर, भुबनेश्वर ७५१ ००७

ISBN 0 86125 971 8

फोटो टाईपसेटींग

कुलभूषण कॉम्प्युसेट कॉर्पो., मुंबई ४०० ०२८.

मुद्रक

शांतादुर्गा प्रिंटर्स (प्रा.) लिमिटेड, शीव, मुंबई-४०० ०२२

प्रकाशक

ओरिएंट लाँगमन लि., कामाणी मार्ग,

बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८.

मोहिनी (म्हाळसा)

समुद्रमंथनातून चौदा रत्नं निघाली. देव नि दानव या दोघांनीही समुद्रमंथनात भाग घेतला होता. त्यावेळी समुद्रातून सुरा नि अमृत बाहेर पडलं. तेव्हा सुरा कुणी घ्यायची नि अमृत कुणी घ्यायचं याबद्दल वाद झाला.

देव म्हणाले, "आम्हाला अमृत हवं."

दैत्य म्हणाले, "बाकीची सारी रत्नं तुम्ही उपटलीत. आता आम्हाला अमृत द्या."

तंटा मिटेना, तेव्हा देवांनी आणि दैत्यांनी ठरवलं की विष्णुकडे जाऊन निकाल करावा. त्याप्रमाणे ते विष्णुकडे गेले आणि म्हणाले, "देवाधिदेवा, सर्व रत्नांची वाटणी झाली. आता सुरा आणि अमृताची वाटणी व्हायची आहे. तर ती कशी करावी ? अमृत देवांना द्यावं की असुरांना ? मदिरा कुणाला द्यावी, ते पण सांगा."

"छान ! छान ! सांगतो. तुम्ही सर्वजण जा आणि जेवायला पंगत करून बसा. एक स्त्री येईल नि ती सुरा

नि अमृत वाढील. ज्याला जे मिळेल ते त्याने घ्यावं. कबूल ?'' विष्णूनं विचारलं. ''कबूल'' सारेजण एका सूरात म्हणाले.

मग विष्णूने सांगितल्याप्रमाणे देव नि असुर पंगती करून बसले. एक पंगत देवांची नि एक असुरांची. तेवढ्यात विष्णु मोहिनीचे रूप घेऊन हातात पात्र घेऊन वाढायला आला. देवांना हे अगोदरच कळलं होतं. ते शांत राहिले. पण बिचाऱ्या असुरांना मात्र मोहिनीच्या अपूर्व लावण्याने भूल घातली. ते खुळावले. तिच्याकडे बघतच राहिले. मोहिनी भराभर वाढत गेली. देवांना तिने अमृत वाढलं नि असुरांना मदिरा वाढली. फक्त असुर राहूला संशय आला होता त्यामुळे तो देवांच्या पंक्तीत घुसून बसला होता. त्याला तेवढं अमृत मिळालं. तो ते प्याला. ही गोष्ट चंद्राच्या लक्षात आली आणि त्याने मोहिनीला खुणावलं. त्याबरोबर मोहिनीरुपी विष्णुने सुदर्शन चक्र सोडून त्याचं मस्तक उडवलं. पण राहुचं शिर आकाशात उडालं नि धड पश्चिम समुद्राकडे पळू लागलं. हा प्रकार पाहून देव नि राक्षस दोघेही घाबरले. ते त्या धडाच्या मागे जाऊन त्याचा नाश करायचा प्रयत्न करू लागले. महादेव शंकराने आपला त्रिशूळ त्याच्यावर फेकला. धडाच्या पोटात तो त्रिशूळ शिरला. पण त्या धडामध्ये अमृत असल्याने तो मरेना.

शेवटी राहूच्या कंठनाळात घशात आंगठा घालून शंकराने ते अमृत बाहेर काढलं. राहूच्या घशातून निघालेलं ते अमृत वाहू लागलं. त्याची नदी झाली. तिचं नाव प्रवरा नदी. ही नदी उत्तर समुद्राला मिळणार होती. पण गौतम ऋषीने शंकराची प्रार्थना केली की ''देवा ही प्रवरा नदी गौतमीला मिळू दे.'' गौतमी म्हणजे गोदावरी नदी. गौतमाच्या विनंतीप्रमाणे प्रवरा गोदावरीला मिळून पूर्व समुद्राकडे गेली. या गौतमी-संगमावर महाराष्ट्रात नगर जिल्हयातल्या कोपरगावात, मोहिनी देवीचं मंदिर आहे. राहूचं धड पायाखाली घालून त्याच्यावर मोहिनी देवी बसली आहे. ही गोष्ट म्हाळसा डोंगरावर घडल्याने मोहिनीचंच नाव म्हाळसा असं इथे पडलं.

ही घटना घडल्यापासून चंद्र नि राहू यांचं कट्टर वैर जुंपलं. जेव्हा संधी मिळते त्यावेळी पौर्णिमेच्या दिवशी राहू चंद्राला ग्रासतो. त्यालाच आपण चंद्रग्रहण म्हणतो.

मोहिनीने दैत्यांना मद्य वाढल्यावर राहिलेलं मद्य तिने भूमीवर टाकून दिलं. त्या मदिरेची देखील मधुमती नावाची नदी झाली. शंकराच्या आशीर्वादामुळे मधुमतीला तीर्थाची योग्यता प्राप्त झाली. ग्रहणाच्या वेळी मधुमतीत स्नान केलं तर सर्व पापांचा नाश होतो अशी भाविकांची समजूत आहे.



शंकर व मोहिनी

ब्रह्मा, विष्णु, महेश या तीन देवांपैकी फक्त विष्णूनेच स्त्री रुपात अवतार घेतला. इतकंच नाही तर एका बालकालाही जन्म दिला. अमृताच्या वाटणीच्या वेळचं मोहिनीच्या रूपाचं वर्णन ऐकून शंकराला मोहिनीरूप पाहायची इच्छा झाली. विष्णूची आणि त्याची भेट झाल्यावर त्याने आपली इच्छा विष्णूला बोलून दाखवली. विष्णूने "होय" म्हटलं आणि शंकराला एका उद्यानात जायला सांगितलं. त्याप्रमाणे तो उद्यानात गेला नि इकडे तिकडे हिंडू लागला. थोड्या वेळाने शंकराने एक अत्यंत सुंदर तरुणी चेंडू खेळत खेळत उद्यानात येताना पाहिली. शंकर तिच्याकडे ओढला गेला. मोहिनीला धरावं म्हणून तो तिच्या मागे जाऊ लागला. मोहिनी त्याला हुलकावण्या देत तिथून निघून गेली. शंकराला चैन पडेना. तो तिच्या मागे लागला. पण नंतर तो बघतो तर विष्णु आपल्या नेहमीच्या स्वरुपात पार्वतीजवळ उभा होता. शंकराला पाहून त्याने स्मित केलं. शंकर लाजला. त्याने विष्णूची क्षमा मागितली.

विरोचन आणि मोहिनी

विरोचन राक्षस फार उन्मत्त झाला. त्याने देवांना

नकोनकोसं करून सोडलं. तेव्हा सर्व देव विष्णूकडे गेले आणि त्यांनी विरोचनाचा वध करण्याची त्याला विनंती केली. विष्णूने होकार दिला. त्याने तिसऱ्यांदा मोहिनी रूप घेतलं आणि राक्षस-राजा विरोचनाच्या उद्यानात तो गेला. मोहिनीची गौर अंगकांती, निळे-निळे चंचल डोळे, सडपातळ सुबक बांधा, सुंदर हसरं मुख, साजरे गोजरे हातपाय, ठुमकत-मुरकत चालणं, मध्येच नाचणं, मध्येच थांबणं विरोचनाला वेडं करून गेलं. मोहिनी त्याच्यावर लाजरे नेत्रकटाक्ष टाकू लागली. थांबून राहिली. तेव्हा तिच्याजवळ जाऊन विरोचन म्हणाला, "सुंदरी, तू कोण आहेस ? तू कुणाची बायको ? कोण तो भाग्यवान ?"

मोहिनी म्हणाली, "महाराज, माझं नाव मोहिनी. मी कुमारिका आहे. जास्त काय सांगू ?" म्हणून ती लाजली.

ते लाजणं पाहून विरोचनाला अत्यंत हर्ष झाला. तो म्हणाला, "तर मग सुंदरी, तू माझ्याशी लग्न करशील ना ? मी विरोचन दैत्य त्रिभुवनाचा राजेंद्र आहे. देवही माझ्या हुकमतीत असतो. तू माझी पट्टराणी हो. मी तुझ्या वचनात राहीन."

"खरंच राहाल वचनात ? मी म्हणेन ते कराल ?"

मोहिनीने विचारले.

"करीन. तुझी शपथ; मी तू म्हणशील ते करीन."

"बघा, दिलेलं वचन मोडायचं नाही बरं का."

असं म्हणून त्याला वचनात बांधून टाकून मोहिनी त्याच्याबरोबर राजवाड्यात गेली नि त्याच्याबरोबर सिंहासनावर बसली. त्याची पट्टराणी झाली.

काही दिवस लोटले; तेव्हा मोहिनी म्हणाली, "महाराज, मी नवस केला होता की मला मुलगा व्हावा. देवाच्या कृपेने माझी इच्छा पुरी व्हायची वेळ आली आहे. तर आज त्या व्रताची सांगता करायला हवी. आपण आता बाप होणार म्हणून मला कोण आनंद झाला आहे म्हणून सांगू ! आज मीच आपल्या अंगाला तेल, उटणं चोळून नाहू घालणार आहे. आरती ओवाळणार आहे. उठा तर."

विरोचन उठला. मोहिनीने त्याच्या अंगाला उटणं लावलं. पण केसांना तेल लावता येईना. राजा काही केल्या डोकीवरचा मुकुट काढीना. रात्रंदिवस त्याच्या डोकीवर तो मुकुट असे. रात्री निजतानाही विरोचन मुकुट डोकीवर ठेवूनच निजे. त्या मुकुटात त्याचं प्राण रहस्य दडलेलं होतं ना ! त्याच्या टाळूवर आघात केला तरच तो मरणार होता. म्हणून तो कधी उघड्या माथ्याने

राहात नसे. मोहिनीला हे कळलं नव्हतं थोडंच ? अंगाला उटणं लावता-लावता ती राजाला म्हणाली, "महाराज, जरा मुकुट बाजूला करा ना. केसांना सुगंधित तेल लावते." तिने त्याच्या नाकाजवळ हात नेला. काय अपूर्व तो सुगंध ! विरोचनाने प्रथमच असा सुवास अनुभवला. पण तो घुटमळला.

"मोहिनी डोकं राहू देत ना. खालच्या बटांना लाव तेल. वरची टाळू राहू दे. मुकूट कशाला काढायचा ?" विरोचनानं विचारलं.

त्यानं विचारल्यावर आपल्या मऊ मऊ हातांनी मोहिनीनं त्याच्या मानेला स्पर्श केला. किती सुखकर तो स्पर्श ! पण तरीही विरोचन माथ्यावरचा मुकुट काढायला तयार होईना.

मोहिनी लाडिक रुसली, "मला वचन दिलंत ते खोटंच ना मग ? मी जाते कशी. इथे मला कोण विचारतं आहे ?" असं म्हणून ती चार पावलं चालून गेली.

विरोचन घाबराघुबरा झाला. "मोहिनी, मला सोडून जाऊ नको. हा बघ मुकुट काढला."

विरोचनानं मुकुट काढल्यावर हसत हसत मोहिनी मागे वळली. विरोचनाच्या माथ्यावर तिने आंगठा चेपून धरला. हजार पर्वतांचं ओझं डोकीवर पडल्यासारखं

विरोचनाला वाटलं. खरं म्हणजे मोहिनीने त्याच्यावर त्रिभुवनाचा भार घातला होता. त्यामुळे विरोचनाचा चेंदामेंदा झाला. शब्दही तोंडून फुटायच्या आत तो रक्तामांसाचा गोळा होऊन पडला.

तो पडताच देवगण जमले. त्यांनी विष्णूची स्तुती केली. तेवढ्यात नारद तिथे येऊन ठेपला आणि विनोदाने म्हणाला, "हे काय देवा ? आपण गरोदर होता ना ? मुलासाठी नवससुद्धा केला होतात. मी काळजीत पडलो की आपलं बाळंतपण कसं पार पडतं म्हणून !"

नारदाचे बोल ऐकून मोहिनीने आपला डावा पाय लांब करून झाडला. त्याच्या आंगठ्यातून एक बालक बाहेर पडलं. मोहिनीने त्या बालकाचं नाव बळी ठेवलं. मग त्यालाच विरोचनाच्या सिंहासनावर बसवलं नि ती अदृश्य झाली.

भस्मासुर आणि मोहिनी

चवथ्या वेळी भस्मासुराचा वध करण्यासाठी विष्णु मोहिनी झाला. भस्मासुरानं शंकराची आराधना केली आणि 'मी ज्याच्या डोकीवर हात ठेवीन तो भस्म होऊ दे,' असा वर त्यानं शंकराकडून मागून घेतला. त्यामुळे त्या राक्षसाचं नाव भस्मासुर पडलं. वर मिळाल्यावर

काय विचारता; भस्मासुर वाटेल त्याला वाटेल तसा जाळीत सुटला.

एकदा शंकराच्याच मागे भस्मासुर लागला. तेव्हा शंकर विष्णूला विनवून म्हणाला, "याचा वध करायला तूच काय तो समर्थ आहेस."

"होय, तुम्ही वर द्यावा नि आम्ही निस्तरावं असंच ना ? पण ठीक आहे. बघतो मी," विष्णु विचार करीत म्हणाला.

मग मुसमुसत्या लावण्याने बहरून गेलेल्या मोहिनीचं रूप घेऊन भस्मासुरापाशी तो पोचला. मोहिनीला पाहून भस्मासुर भुलला. "माझी राणी हो," असं म्हणाला.

मोहिनी म्हणाली, "राणी होईन; पण मी नाचेन तसं तुम्ही नाचाल तर. जसे हातवारे मी करीन तसे तुम्ही कराल तर !"

"हात्तेचा ! यात काय आहे ? चल आपण नाचू," भस्मासुर म्हणाला.

मग त्याच्यासमोर जरा अंतरावर राहून मोहिनी नाचू लागली. तिने कमरेवर हात ठेवले तसे भस्मासुराने ठेवले. तिने गुढघा वाकवला तसा त्याने वाकवला. तिने गिरकी घेतली तशी याने घेतली. मोहिनीचं नृत्य कमालीचं

ढंगदार नि मोहक; याचं नुसतं बेंगरूळ. मोहिनीचे आविर्भाव विलोभनीय आणि गती कधी संथ तर कधी जलद. तिची बोटं म्हणजे केळफुलातल्या नाजुक कळ्या. ती बोटं ती नाजुकपणे हलवायची, वळवायंची. तिचे पाय तर विचारुच नका. थयथय नाचताना विश्वाचा सारा नखरा तिच्या पावलात उतरल्यासारखा वाटायचा. तर भस्मासुराचा नाच म्हणजे प्रचंड नि बेडौल बेडुक-उड्या ! असा तो नाच चालू होता. मोहिनीच्या मनमोहक हालचाली पाहून तो इतका मोहिनीमय झाला की आपण जणू दुसरी मोहिनीच झालो असं त्याला वाटू लागलं. तो थकला. नाचानं झिंगला. बेभान नाचत राहिला. हे पाहून मोहिनीने आपला उजवा हात आपल्या मस्तकावर पसरून ठेवला. भस्मासुरानं सहीसही तिचं अनुकरण केलं. एका क्षणात तो पेटला नि त्याची राखरांगोळी झाली. त्याचा वर त्यालाच भोवला.

मोहिनी आली तशीच निघूनही गेली. विष्णु देवानं श्रांत होऊन शेषशय्येवर अंग टाकून दिलं. देवांनी मात्र तिथे येऊन जयघोष केला. अशा या मोहिनी देवीच्या कथा !

कन्याकुमारी

कन्याकुमारी हे नाव भारतात काय, पण जगात सर्वांना माहीत आहे. केरळात, भारताच्या अगदी दक्षिणेकडच्या पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावरच्या टोकावरच्या मंदिराचं हे नाव आहे. कन्याकुमारीमुळे किंवा कुमारी कन्येमुळे हे नाव पडलं आहे हे सांगायला नकोच. स्वामी विवेकानंदांना याच ठिकाणी साक्षात्कार झाल्यामुळे हल्ली या स्थळाला विशेष महत्व आलं आहे. पण कन्याकुमारी कोण नि तिचं हे मंदिर इथे कसं झालं, ही कथा अतिशय मनोरंजक आहे. देवींच्या अनेक कथांपेक्षा ही स्थलसापेक्ष कथा सुरस तर आहेच; पण अत्यंत वेगळीही आहे. बाकीच्या देवींच्या कथा सुखान्त आहेत; सुफळही आहेत. पण ही कथा करुण आणि विदारक आहे. बाकीच्या कथांमधील सर्व देवता या विवाहित आहेत; पण ही एकच देवी कुमारी आहे. या कुमारी देवीला लग्नाचा ध्यास लागला आहे; पण अडचण नियोजित वरच उपस्थित करतो. लग्न कधी तरी लागायचं आहे; पण अजून लागलेलं नाही. ती वाट

पाहातेच आहे. वधूवेश तिने कायम धारण केलेलाच आहे. वरमाला हातात आहे; पण वराचा पत्ता नाही. यात अपेक्षाभंग नाही की अपेक्षेची पूर्ती नाही. फक्त चिरंतन अपेक्षा आहे. तेवती आशा आहे. तिच्यात कमालीचा सोशिकपणा आहे नि करारी बाणा पण ! अशी ही विवाहोत्सुक कुमारी प्रेमिकेची दाहक नि मोहक कथा आहे.

बाणासुर नावाच्या दैत्याने अतिशय उग्र तप केलं; त्यामुळे ब्रह्मदेव त्याच्यावर प्रसन्न झाला आणि म्हणाला, "वर माग."

बाणासुराने वर मागितला, "देवा, मला स्त्रीच्या हातूनच मृत्यू येऊ दे. देव, दैत्य, माणूस यातल्या पुरुषापासून नको."

"तथास्तु," ब्रह्मदेवानं आशीर्वाद दिला.

मग काय ? बाणासुराच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यानं त्रैलोक्य जिंकलं, देवांना जेरीला आणलं. देवांची पूजा-अर्चा, यज्ञ वगैरे त्यानं बंद पाडले. तोच स्वर्गाचा स्वामी बनला. पण अशा वेळीही मार्कंडेय मुनी देवांच्याच नावानं यज्ञ करतो आहे असं त्याला कळलं. तो यज्ञस्थळी गेला आणि "देवांबरोबर माझा वाटा मला मिळाला पाहिजे," असं म्हणाला. हे

मार्कंडेयाने नाकारलं हे सांगायला नकोच. मार्कंडेयाचा यज्ञ त्यानं उध्वस्त केला. तेव्हा मार्कंडेय चिडला आणि त्याने बाणासुराला शाप दिला की "तुझा वध स्त्रीच्या हातून होईल." हा शाप ऐकून मात्र बाणासुर चिडला; कारण आता त्याचा वध निश्चित होता. तो आपले गुरु शुक्राचार्य यांच्याकडे गेला; आणि मृत्यू चुकवायला उपाय काय म्हणून विचारू लागला.

शुक्राचार्य म्हणाले, "ठीक आहे बाणासुरा, घाबरू नकोस. फिरून तप कर आणि मला कुमारिकेच्याच हातून मरण येऊ दे असा वर मागून घे; कारण कुमारिका फारच क्वचित् आढळतात."

बाण बुचकळ्यात पडला नि म्हणाला, "गुरुजी, कुमारिका क्वचितच असतात याचा अर्थ काय ?"

शुक्राचार्य हसले आणि म्हणाले, "बाणा, शिव आणि शक्ती यांनीच सारं विश्व व्यापलं आहे. जोडप्यानेच सारे जगतात. पुरुष स्त्री शिवाय जगु शकत नाही नि स्त्री पुरुषाशिवाय राहू शकत नाही. तेव्हा कुमारिका ही आपल्याशी कुणी सुंदर पुरुष कधी लग्न करील का, या अपेक्षेनेच जगत असते. त्यामुळे कुमारिकेच्या हातून मरण येणं कठीणच ! समजलं ?"

बाणानं परत तप केलं. ब्रह्मदेवानं, 'कुमारिका तुझा

वध करील,' असं वरदान दिलं.

बाण आनंदला. कुमारिका असणं नि कुणी कुमारिकेनं आपल्याला मारणं ही गोष्ट त्याला संभवनीयच वाटली नाही. त्याचा पुंडावा वाढला.

त्या वेळी देवांची दैना पाहून शिवाला त्यांचा कळवळा आला. त्यानं पार्वतीला सांगितलं, "पार्वती, आता तूच देवांचं तारण करू शकशील. बाणाला मार आणि जगाला सुखी कर."

शिवाच्या आज्ञेप्रमाणे पार्वतीने कुमारी कन्येचं रूप घेतलं. त्या कुमारी कन्येचं नाव पुष्पहासा, समुद्रतीरावर तिनं शिवाची आराधना करून तप करायला सुरुवात केली. शिव प्रसन्न झाला. तिच्यापुढे उभा राहिला आणि म्हणाला, "मुली, तुला काय हवं ?"

पुष्पहासा म्हणाली, "महादेवा, तुमच्याशी लग्न करून अखंड तुमच्या सहवासाचा लाभ व्हावा अशी माझी प्रार्थना आहे."

"ठीक आहे, ब्रह्मदेवाचा एक दिवस चार हजार युगांचा असतो. जेव्हा दहा ब्रह्मे मरतात, तेव्हा विष्णूची एक घटका होते; बारा विष्णु मरतात तेव्हा माझ्या आयुष्यातला एक क्षण झालेला असतो; तो क्षण झाला

की मी रुद्र हे नाव घेऊन तुझ्याशी लग्न करीन. तोपर्यंत तू समुद्रकाठी तप करीत बस आणि मी शुचींद्र इथे तप करीत राहातो."

पुष्पहासेनं शिवाला नमस्कार केला. समुद्रकाठी, शिवाने सांगितलेल्या स्थळी जाऊन ती तप करू लागली; म्हणून त्या स्थळाला कन्याकुमारी हे नाव पडलं.

पुष्पहासा तप करीत राहिली; पण शिव लग्नाची मुदत् वाढवीतच राहिला. अखेर त्यानं लाख युगांपर्यंत ती मुदत वाढवली. ही मुदत भरेपर्यंत शिव आणि पुष्पहासा तप करीतच राहणार हे उघड होतं.

पण मध्येच शिवाला पुष्पहासेची तीव्रतेने आठवण झाली. त्यानं देवांना सांगितलं की मला तिच्याशी लग्न करायचं आहे. हे ऐकून देवांच्या पोटात गोळा उठला, कारण कन्याकुमारीचं जर लग्न झालं तर तिच्या कुंवार-पणात दैत्याचा वध करायची जी शक्ती उत्पन्न झाली आहे तीच नष्ट होईल. मग बाणासुर मरायचा कसा ? शेवटी त्यांनी एक युक्ती योजली. सर्व देवांनी नारदा करवी महादेवाला एक निरोप पाठवला, तो असा : "लग्नाच्या वेळी आपल्याला नारळ द्यावे लागतील. ते बिनडोळ्याचे असले पाहिजेत. आंबे तर हवेतच पण त्यांच्यात बाठे असू नयेत. विड्याची पानं हवीत पण

त्यांना रेषा असता कामा नयेत." नारद हा निरोप घेऊन महादेवाकडे आला. महादेवानं देवांच्या सर्व अटी मान्य केल्या आणि त्या साऱ्या वस्तू महत्‌प्रयासाने मिळवल्या. मग त्या दिवशी देवांनी मध्यरात्रीचा मुहूर्त निश्चित केला.

शुचींद्रहून मोठ्या थाटात महादेवाची वरयात्रा निघाली. सारे देव त्या यात्रेत सामील झाले होते. नारद मात्र त्या यात्रेत नव्हता. यात्रा चालू असतानाच अचानक कोंबडा आरवला. खरी गोष्ट अशी होती की नारदानं स्वतःच कोंबड्याचं रूप घेतलं होतं. महादेवाला वाटलं मुहूर्ताची वेळ तर टळून गेली, आता जाण्यात काय अर्थ आहे ? बिचारा महादेव तसाच परत निघून गेला.

इकडे सूर्योदय झाला तरी महादेव आला नाही हे पाहून वधूवेषात वाट पाहात बसलेली कन्याकुमारी चिडली. दुःखाच्या भरात लग्नात भोजनासाठी तयार ठेवलेल्या साऱ्या वस्तूंचं तिने शंख शिंपल्यात रुपांतर करून टाकलं. आता आयुष्याच्या अंतापर्यंत या समुद्रतीरी शिवाची वाट पहायची असा तिनं निश्चय केला. कधी ना कधी तरी शिवा परत येईलच अशी तीव्र आशा तिला वाटत होती. हीच अपेक्षा मनात बाळगून तिनं परत तप करायला सुरवात केली.

एक रूपसुंदर कुमारी युवती, समुद्रकाठी शिवासाठी तप करीत बसलेली आहे, ही वार्ता बाणासुराच्या कानी कशी जाणार नाही ? तो तिचा शोध घेत तिच्याकडे आला. तिचं रूप पाहून तो मोहित झाला, त्यानं तिला मागणी घातली. पुष्पहासेनं बाणासुराला एकदम नकार दिला नाही. "उंबराची नि वडाची फुलं आण," असं म्हणून तिने त्याला अप्राप्य वस्तू आणायला सांगितल्या. बाणानं आपल्या मायेच्या प्रभावानं तशी फुलं तयार करून आणली; पण कन्याकुमारीनं आपल्या दैवी शक्तीनं ती नाहीशी करून टाकली. बाणासुराचे देवीला खुष करण्याचे सारे प्रयत्न विफल ठरले. अखेर आपल्या अचाट पुरुषी बलाने त्यानं तिला ओढण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर देवीने त्याला आपल्या आयुधांनी मारून टाकलं. तिचं कौमार्य शक्तिशाली ठरलं. पण शिवाशी लग्न करण्याची तिची आशा मात्र अपूर्णच राहिली.

आणखी एक लहान गोष्ट कन्याकुमारीच्या संबंधात सांगायची राहून गेली; ती अशी :

या देवीला प्रलयबंधिनी असंही नाव आहे. कन्याकुमारीनं बाणासुराचा पराभव केल्यावर देवांनी तिची स्तुती केली आणि जिथे युद्ध झालं तिथेच तिने कायम वास्तव्य करावं अशी तिची प्रार्थना केली.

समुद्रकाठी राहाण्यास देवी त्यामुळेच तयार झाली. पण तिची पूजा करताना समुद्राचं खारट पाणी कसं चालणार ? देवांना आणि माणसांना पूजेला नेहमी गोडं पाणी लागतं. तेव्हा देव म्हणाले, "देवी, तुला रोज स्नान घालताना आम्हाला गोडं पाणी लागेल, तर ते तू कृपा करून दे." देवीनं आपला भाला पृथ्वीत खुपसला. त्याबरोबर पाताळातून पाण्याचा लोटच्या लोट उसळून वर आला. त्या महापूराने सर्व पृथ्वी भरून गेली. तो महाप्रलय पाहून देव भयभीत झाले. "देवी, माते दया कर. या प्रलयापासून विश्वाला वाचव," देवांनी प्रार्थना केली. ही प्रार्थना ऐकून देवीनं भूमीच्या एका विवरात पाणी राहू दिलं. तिनं महापूराला बंधन घातलं; म्हणून तिला प्रलयबंधिनी असं नाव पडलं. त्या विवरातल्या पाण्याला मूलगंगा म्हणतात. कन्याकुमारीला दररोज या पाण्यानेच स्नान घातलं जातं.

सुभद्रा

सुभद्रेचं लग्न

वसुदेवाला दोन बायका होत्या. रोहिणी आणि देवकी. विष्णूच्या सातव्या अवतारामध्ये (रामावतार) शेष रामाचा धाकटा भाऊ झाला होता. त्याचा विष्णूचा थोरला भाऊ होण्याचा हट्ट होता. शेषाने बलरामाच्या रुपाने रोहिणीच्या पोटी जन्म घेतला आणि नंतर विष्णु देवकीपोटी जन्माला आला. अशा रीतीने विष्णुनी शेषाचा हट्ट पुरवला.

सुभद्रा ही खरी म्हणजे बलरामाची धाकटी बहीण. वसुदेव आणि रोहिणी यांची मुलगी. म्हणजे कृष्णाची सावत्र बहीण. पण भारतीय परंपरेनं तिलाच कृष्णाची बहीण ठरवली आहे; कारण त्या तिन्ही भावंडांचं प्रेमच तसं होतं. सावत्रपणाचा लवलेश त्यांच्यात नव्हता. बलरामाचं कृष्णावर जिवापाड प्रेम होतं; तसंच या दोघा भावांचं सुभद्रेवर.

सुभद्रा ही पार्वती, लक्ष्मी अशा कुठल्याच देवतेचा

अंश मानली जात नाही. तरीही तिची पूजा तिच्या भावांबरोबर होते. पुरीला जगन्नाथाचं मंदिर आहे त्यात बलराम, कृष्ण नि सुभद्रा यांच्या मूर्ती आहेत. सुभद्रा पूर्णपणे मानवी असूनही ती देवता पदवीला पोचली. तिच्यातला दैवी अंश लहान वाटला तरी तिची मानुषी म्हणून थोरवी देवांनाही ठेंगणं करणारी आहे. दुःखी माता म्हणून सुभद्रेची बरोबरी ना कुंती करू शकते ना द्रौपदी !

सुभद्रा जत्यंत शालीन होती. तिचं लावण्य अप्रतिम होतं. बोलणं मंजुळ होतं. वडिलांच्यापेक्षा बलराम दादाचा धाक तिला जास्त वाटायचा. सुभद्रा गोरी होती, देखणी होती; पण शांतपणा हा तिचा मुख्य गुण होता.

सुभद्रा मोठी झाली, तेव्हा एकदा तिची नि अर्जुनाची गाठ पडली. सुभद्रेला अर्जुन इतका आवडला की सांगता सोय नाही. अर्जुन हा कृष्णाचा परम मित्र; त्याला देखील सुभद्रा मनापासून आवडली. अर्जुन आणि सुभद्रा यांनी एकमेकांबरोबर लग्नाच्या आणाभाका घेतल्या. सुभद्रेला वचन देऊन अर्जुन गेला आणि लवकर परतला नाही. श्रीकृष्ण हे सारे बघत होता. त्यालाही हा जोडा पसंत होता. पण तो धूर्त होता. त्याने उघड काहीच दाखवलं नाही.

इकडे सुभद्रा मनात झुरत असतानाच बलराम दादानी तिचं लग्न कौरवांचा राजा दुर्योधन याच्याशी ठरवलं. वास्तविक हस्तिनापूरचा राजा धृतराष्ट्र होता. पण धृतराष्ट्र आंधळा होता म्हणून पराक्रमी नि देखणा दुर्योधनच राज्याचा कारभार पाहायचा. राजा म्हणून दुर्योधनाला प्रजा फार मानीत असे. वास्तविक अर्जुन-सुभद्रेचं प्रेमप्रकरण बलरामाला माहीत होतं. त्याची राणी रेवती हिलाही माहीत होतं. पण कुठे निर्धन अर्जुन नि कुठे राजा दुर्योधन ? आपली बहीण ऐश्वर्यात लोळावी असं बलरामाला वाटलं नि त्याने तिचं लग्न मुद्दाम नि तातडीने दुर्योधनाशी ठरवून टाकलं. मुहूर्तही ठरला.

लग्न ठरलं नि सुभद्रा दुःखी झाली. बलरामाचा स्वभाव फार रागीट होता. सुभद्रेला त्याची जशी जरब वाटे; तशी कृष्णाची वाटत नसे. कृष्णाची भेट घेऊन तिने त्याला 'मी अर्जुनाशिवाय कुणाला वरणार नाही. हे लग्न तू मोड,' असं सांगितलं. चतुर कृष्ण म्हणाला, "मी दादांना काहीही सांगणार नाही. तुझं लग्न अर्जुनाशी झालं म्हणजे झालं ना ?"

"अरे, पण मुहूर्तसुद्धा ठरला; आता वेळ तरी कुठे आहे ? सांग कृष्णा, कसंही कर नि अर्जुनाला घेऊन ये ना. कृष्णा, हे लग्न तू मोड."

"शहाणीच आहेस. लग्न मोडलं तर दादा रागावतील त्याची काय वाट ? तू अर्जुनाशी लग्न करणार नि बोलणी मला बसणार. खासा न्याय !"

"मग कृष्णा, मला मरण्याशिवाय गत्यंतर नाही. मी नाही दुर्योधनाशी लग्नं करणार."

"पण सुभद्रे, तुझा अर्जुन तर तीर्थयात्रा करीत हिंडतो आहे. त्याला तुझी पर्वा असती तर तुझं लग्न दुर्योधनाबरोबर ठरल्याचं ऐकल्यावर त्याला स्वस्थ राहावलं असतं का ? दादांना सारं नीट कळतं. ते उगीच काही करायचे नाहीत," असे म्हणून कृष्ण हळूच हसला.

ते पाहून सुभद्रा चिडली नि म्हणाली, "बरं तर कृष्णा ! तू पण दादांचाच झालास ना ? माझं कुणीच नाही. मी एकटी. कडक बंदोबस्तात दादांनी मला ठेवलंय ! विष खायची सुद्धा पंचाईत. रेवतीवहिनी सारखी माझ्या मागे मागे असते. कृष्णा, अर्जुनाचं प्रेम खोटं नाही रे. तो मला विसरायचा नाही ! पण कुठे गेलाय रे तो ? मी काय करू आता ? तू मदत केलीस तरच सारं काही घडून येईल. मला माहीत आहे सारं. पण तू तर मनावरच घेत नाहीस. तुला सारी चेष्टाच वाटते."

"अग चेष्टा नाही तर काय ? अर्जुनाचा भरवसा

कुणी धरावा ? खुळे, तूच सांग !"

"असू दे मी खुळी ! तू तर सारं जाणतोस ना ? तुलाही माझं प्रेम खोटं वाटतं का ? दुर्योधनाशी मी कसा संसार करू ? ऐक कृष्णा, माझ्यासाठी अर्जुनाला तू घेऊन ये; नाही तर मला त्याच्याकडे पोचव. मी काय करू ?" असं म्हणून सुभद्रा मुसमुसून रडू लागली.

"खुळे, रडू नको. अग, तुला वाटतो तसा दुर्योधन काही वाईट नाही बरं का ? दादांची निवड चुकीची नाही बाई !"

"कृष्णा, बहिणीसाठी तू काहीच करीत नाहीस ? पण तुझं आता माझ्यावर प्रेम कुठे राहिलय म्हणा ! आता जीवच जायला हवा माझा. दुसरा काही मार्ग नाही."

सुभद्रेचे अश्रू आटले होते. तिच्या डोळ्यात निश्चयाची झाक होती. कृष्ण जणू तिच्या आता ध्यानीच नव्हता.

असा थोडा वेळ गेला. कृष्ण तिच्याकडे बघत राहिला. कौतुकाने, आदराने आणि काहीसा चिंतेने. मग अगदी हळूच तो म्हणाला, "काय ग सुभद्रे, अर्जुनाजवळ सत्ता नाही, राज्य नाही. सध्या तर तो वनवासीच झाला आहे. नीट विचार केलास ना ? ऐश्वर्य सोडून भलत्याच नादाला का लागतेस ? दादांना तुझी काळजी नाही

का ?"

पण हे बोल सुभद्रेच्या कानी पडलेच नाहीत जणू. तिची मुद्रा झरझर बदलत होती. तिच्या ध्यानीमनी फक्त तिचा अर्जुन होता. जगायचं तर त्याच्यासाठी, मरायचं तर त्याच्यासाठी. तिच्या तोंडावर एक स्मितरेखा उमटलेली मात्र कृष्णाला दिसली. "सुभद्रा, हसू कशाचं आलं ग ? निश्चय बदललास का ? काय ? ऐकलंस ना मी काय म्हणतो ते ?"

सुभद्रा भानावर आली नि लाजून म्हणाली, "भाऊ, का उगीच चिडवतोस रे ? जसं काही तुला माहीतच नाही. तूच तर सारं जुळवून आणलंस नि आता आपण 'त्या' गावचेच नाही असं दाखवतोस ! तू पण दादांना भितोस ?"

"नाही ग, मी दादांवर लोभ करतो म्हणून मला चिंता वाटते. चिंता त्यांची. तुझी नाही."

इतक्यात 'नारायण नारायण' असा गजर करीत नारदमुनी तिथे आले. सुभद्रा दचकून उभी राहिली.

कृष्ण म्हणाला, "यावं यावं महर्षी ! आज इकडे कुठे ?"

"वा ! वा ! काय मौज आहे. द्वारकेत लग्न आहे,

मोठा सोहळा आहे असं ऐकलं. वर कौरवेश्वर आणि वधू कृष्णाची भगिनी ! काय नामी जोडा आहे ! नारायण ! नारायण !''

सुभद्रा चिडून लाल झाली. पण काही बोलली नाही. कृष्ण म्हणाला, ''सुभद्रे, मुनी महाराजांना वंदन कर. आशीर्वाद फुकट जाणार नाही.''

सुभद्रा नाइलाजाने उठली. तिनं नारदमुनींना वंदन केलं.

''सुपुत्र होईल. पतीसारखा पराक्रमी, अर्जुना-सारखा – '' एवढे बोलून नारदानी जीभ चावली. ''अस्सं होतं बघा. दुर्योधनाऐवजी हेच नाव निघालं. नारायणाची लीला ! दुसरं काय ? रागावू नको हो सुभद्रे !''

सुभद्रेचा राग कुठल्या कुठे पळाला. कृष्ण मिश्किलपणे हसत होता. सुभद्रा लाजली. ''काय ग सुभद्रे, मिळाला ना आशीर्वाद ?'' सुभद्रा ''काहीतरीच'' असे म्हणत तिथून निघून गेली.

''हं ! त्याचं असं झालं, कृष्णदेवा ! अर्जुन मला नुकताच भेटला. अरण्यात. संन्याशाच्या वेषात. मी आपलं ऐकलं होतं की त्याचं नि सुभद्रेचं लग्न ठरलं आहे म्हणून. पण त्यानं तर संन्यास घेतलेला. मला वाटलं की

काहीतरी विपरीत झालं आहे. शेवटी सुभद्रेबद्दल विचारलं तर वाकडं तोंड केलं. भांडण झालं का म्हटलं तर बोललाच नाही. मग 'तुझे मनोरथ पूर्ण होतील' असा आशीर्वाद त्याला देऊन मी आपल्याला भेटायला आलो; तर नगरात लग्नाची धामधूम चाललेली. दुर्योधन वर नि सुभद्रा वधू ! नारायणाची लीला ! अर्जुनाचा पराक्रम फुकट ! ऐश्वर्यालाच मोल आहे ! नारायण! नारायण!''

''तुम्हाला अर्जुन दिसला होता ना ? तर मुनिवर्य ! आताच इथून जा. तो फार लांब नाही हे मलाही माहीत आहे. लग्नाचा मुहूर्त तुम्हाला माहीत आहे. वर आमच्या गावात आला की वधू देवीच्या दर्शनाला जाईल. मंदिरात रथ सज्ज असेल. त्यावेळी अर्जुनाला म्हणावं तू ये नि सुभद्रेला घेऊन जा.''

''वाहवा ! असाच चाललो. नारायण ! नारायण !'' नारदमुनी गेले.

कृष्ण लग्नघराच्या अनेक कामात गुरफटून गेला. सुभद्रा कानोसा घेत आहे हे दिसत असून त्यानं तिच्याकडे बघितलंही नाही. रुक्मिणीला मात्र तो म्हणाला, 'सुभद्रेबरोबर तू सतत राहा. तिला एकटी सोडू नकोस.'' रुक्मिणी सुभद्रेच्या मागेमागेच राहिली.

लग्नाचा दिवस उजाडला. नगरात वर दुर्योधन



मोठ्या डामडौलात वाजतगाजत आला. कृष्ण बलरामाबरोबर त्याचं स्वागत करायला होताच. प्रेमभरानं त्यानं दुर्योधनाला मिठीच मारली. देवकी, रोहिणी यांनी वराला ओवाळलं. इतक्यात कृष्णानं रुक्मिणीला खुणावलं. "सुभद्रेला देवीच्या मंदिरात जायला हवं. त्वरा करा," कृष्ण म्हणाला. बलराम तर आनंदात बुडून गेला. सुभद्रा आता आपला हट्ट सोडून देवीच्या मंदिरात जाणार होती ! त्याची इच्छा पूर्ण होणार होती. दुर्योधन त्याचा मित्रच होता; आता मेहुणा होणार होता.

रुक्मिणी लगबगीने सुभद्रेला घेऊन रथात चढते न चढते; तोच तिला आठवले की आपण देवीला वाहायचा एक अलंकार विसरलो आहोत; मग तो अलंकार आणायचा बहाणा करून ती सुभद्रेला म्हणाली, "तू पुढे हो. मी दुसऱ्या रथातून येतेच."

सुभद्रा मंदिरापाशी गेली; पायऱ्या चढू लागली. इतक्यात एक सुंदर बलिष्ठ संन्यासी तिला उचलून त्याच रथात चढला नि त्यानं रथ वायुवेगानं चालवला. बलरामाचे शस्त्रधारी सेवक तत्काळ रथामागून धावले नि त्यांनी त्या संन्याशावर बाण फेकायला सुरुवात केली. पण संन्यासी काही कमी नव्हता. हा संन्यासी नव्हे तर अपूर्व धनुर्धर पार्थ अर्जुन आहे, हे बलरामाच्या

माणसांनी ओळखलं. ते मागे हटले आणि कृष्णाकडे गेले. "जे व्हायचं ते झालं," असं म्हणून कृष्ण वाड्याबाहेर पडला. सुभद्रा खुषीने संन्याशाबरोबर निघून गेली हे कळताच, बलरामाला पृथ्वी गिळील तर बरे असे झाले. ही बातमी ऐकून दुर्योधन आला तसाच मागे फिरला. पांडवांच्या विनाशाची घोर प्रतिज्ञा त्याने केली.

कृष्ण बलरामाला म्हणाला, "तरी मी तुला सांगत होतो दादा ! जाऊ दे, आता रागावून काय उपयोग ? सुभद्राचं अर्जुनाबरोबर पळून जाणं मलाही फारसं आवडलेलं नाही. पण शेवटी जनरीत म्हणून काही आहे की नाही ? आता मी आपला तिचा हात त्याच्या हाती देऊन येतो. म्हणजे सगळंच शास्त्रानुसार रीतसर झालं असं म्हणता येईल."

बलराम मुकाट्याने खाली मान घालून बसला. कुठून आपण या फंदात पडलो असं त्याला झालं. अशा तऱ्हेने सुभद्रेचं लग्न अर्जुनाबरोबर झालं. अर्जुनानं सुभद्रेला पळवून नेलं म्हणून या लग्नाच्या प्रकरणाला सुभद्राहरण असं नाव पडलं.

द्रौपदी नि सुभद्रा

लग्नानंतर सुभद्रा अर्जुनाची पत्नी झाली; पण राणी

कधीच झाली नाही. द्रौपदीला सुद्धा अर्जुनानंच स्वयंवरात जिंकून आणली होती; पण ती पाचही पांडवांची पत्नी झाली नि पुढे पांडवांनी कौरवांना लढाईत मारल्यावर त्यांची राणी पण झाली.

सुभद्रा कृष्णाची खरी बहीण. द्रौपदीचं आणि त्याचं मुळात काही नातं नव्हतं; पण परंपरेने द्रौपदीला कृष्णाची मानलेली बहीण बनवून टाकली.

चिंधीची गोष्ट

कृष्ण द्रौपदीला बहीण मानतो; आपल्याहून तिच्यावर जास्ती प्रेम करतो हे सुभद्रेला लग्नानंतर दिसून आलं नि तिला थोडं वाईटही वाटलं. एकदा तर ती कृष्णाला म्हणाली सुद्धा की, "तू माझ्यापेक्षा द्रौपदीवरच जास्त माया करतोस." कृष्ण गप्प बसला. पण थोड्याच वेळाने तो सुरीने फळ कापू लागला. त्यावेळी सुरी लागून त्याची करंगळी कापली नि रक्ताची धार वाहू लागली.

"सुभद्रे ! चिंधी दे ग एक," कृष्ण सुभद्रेला म्हणाला.

सुभद्रा चिंधी शोधीत सुटली. तिला चिंधी गवसेनाच; इतक्यात द्रौपदी तिथे आली. "अगबाई ! हे काय कृष्णा ? करंगळी कापली का ?" असं म्हणून लगेच तिनं आपला नेसलेला भरजरी शालू टरकावला आणि त्याची चिंधी तिने कृष्णाच्या करंगळीला बांधली. हे पाहून

सुभद्रा फार शरमली. कृष्णाने तिच्याकडे पाहिलं नि थोडंसं हसला !

अभिमन्यू

द्रौपदीला पाच मुलगे होते. सुभद्रेला एकच. त्याचं नाव अभिमन्यू. अभिमन्यू फार हुशार नि देखणा होता. सर्वांचा लाडका होता. धनुष्यबाण त्यानंच चालवावा इतका तो अर्जुनाप्रमाणे युद्धाच्या बाबतीत शूर नि कुशल होता. कौरवांबरोबर युद्ध करताना अभिमन्यू मारला गेला. अभिमन्यू एरवी मरणार नाही, म्हणून त्याला मारण्यासाठी चक्रव्यूहाची रचना द्रोणाचार्यांनी केली नि त्याला कोंडून मारण्यात आले. तरुण अभिमन्यू मेला नि पांडव शोकाकुल झाले. मग सुभद्रा तर किती घायाळ झाली असेल ? द्रौपदीचेही पाच मुलगे झोपेत असताना द्रोणपुत्र अश्वत्थाम्यानं कपटानं मारले. द्रौपदीही शोकात बुडून गेली.

गेंदफूल

पांडव जिंकल्यावर राजे झाले. राज्याभिषेकाच्या वेळी द्रौपदी राणीचा थाटमाट काय विचारावा ? हिऱ्या मोत्यांचे अहेर तिला आले. त्यावेळी अर्जुनाने सुभद्रेला विचारलं, "सुभद्रे, तुला काय हवं सांग ! मी देतो."

सुभद्रा म्हणाली, "मला शेषाच्या मस्तकावरचं गेंदफूल आणून द्या."

अर्जुन "ठीक आहे" म्हणून वाड्याबाहेर पडला; तेव्हा त्याला कृष्ण दिसला. "कुठे निघालास अर्जुना ?" कृष्णाने विचारलं.

"सुभद्रेला शेषनागाच्या मस्तकावरचं गेंदफूल हवं आहे."

"असं ? अरे पण ते तर त्याच्या डोक्यावर उगवलं आहे. ते कापून घ्यायला हवं. आता तू असं कर. चर्मकाराचं रूप घे. अरी बरोबर घे नि त्या अरीने ते फूल काप. जमेल ना तुला हे ?" कृष्णानं विचारलं.

"जमेल तर काय !" अर्जुन उतरला.

मग अर्जुन चर्मकाराच्या वेशात पाताळात गेला. शेषाच्या वाड्याच्या अंगणात झोपाळ्यावर शेष राजाची मुलगी उलूपी बसली होती. ती झोके घेत होती. अर्जुनाने सुंदर जोडे बनवले नि उलूपीला दिले. उलूपीनं जोडे कधीच घातले नव्हते. ते कलाकुसरीचे जोडे पाहून तिला फार आनंद झाला. ते जोडे बनवणारा तो सुंदर कारागीर देखील तिला फार फार आवडला. दोघांची गट्टी जमली. 'करीन लग्न तर याच्याशीच' अशी तिनं प्रतिज्ञा केली. आपली मुलगी चर्मकाराबरोबर लग्न करणार हे शेषाला आवडलं नाही. तो अर्जुनावर धावून गेला. दोघांची

चांगलीच जुंपली. इतक्यात कृष्ण तिथे आला. कृष्ण म्हणजे भगवान विष्णूच ना ?

"थांब ! शेषा थांब. हा माझा भक्त अर्जुन आहे. त्याचं स्वागत कर. उलूपी त्याला दे," कृष्णानं शेषाला समजावलं.

देवाचीच आज्ञा ती. शेष नम्र झाला. श्रीकृष्णाची आपल्यावरची माया पाहून अर्जुन सद्‌गदित झाला. उलूपी आनंदली. शेषानं श्रीकृष्णाच्या पायावर मस्तक ठेवलं आणि उलूपीचा हात अर्जुनाच्या हाती दिला.

"आणि वरदक्षिणा रे शेषा ? ती राहिलीच ना ?" श्रीकृष्ण हसून म्हणाला, "काय अर्जुना, खरं ना ?"

अर्जुन लाजला. शेषाच्या मस्तकावरच्या गेंदफुलाकडे त्याची नजर मात्र गेली.

"काय देऊ वरदक्षिणा म्हणून ? सारं राज्य देऊ ?" शेष म्हणाला.

"राज्य नको. रत्नं नकोत. तुझ्या मस्तकावरचं गेंदफूल अर्जुनाला दे."

शेष हातांत शस्त्र घेऊन गेंदफुलाचा देठ कापायला निघाला; तोच त्याला श्रीकृष्णाने अडवलं. "थांब शेषा ! अर्जुनच ते कापील. चर्मकाराची अरीच बरी !"

अर्जुन पुढे झाला. शेषाला नमस्कार करून त्यानं गेंदफूल कापून घेतलं. शेषाच्या मस्तकातून रक्त वाहू लागलं; पण त्याच्या चेहऱ्यावर हसू होतं तसंच होतं. श्रीकृष्णानं प्रेमभरानं शेषाच्या डोक्यावरून हात फिरवला आणि रक्त वाहायचं थांबलं.

"अर्जुना, चल. आपण आता जाऊ या. सुभद्रेची इच्छा पूर्ण झाली !" कृष्ण म्हणाला.

अर्जुनानं ते गेंदफूल श्रीकृष्णाच्या समक्ष सुभद्रेच्या केसांत खोचलं. सुभद्रेचे डोळे सुखानं नि दुःखानं भरून आले.

गेंदफूल म्हणजे झेंडूचं फूल. अर्जुनाने दसऱ्याला ते फूल आणलं; म्हणून दसऱ्याला त्याच्या माळा दाराला बांधतात. पारिजात स्वर्गातून पृथ्वीवर आला नि झेंडू पाताळातून आला असे महाराष्ट्रात मानतात. चर्मकार जातीतल्या स्त्रिया उलूपीसारख्या देवांगनाच आहेत अशीही समजूत आहे.

108

पुराणकथांतील देवतांबद्दल हजारो वर्षांपासून सगळ्यांनाच आकर्षण वाटत आलेलं आहे. अक्षयकथा या मालिकेत पुराणातील अशाच काही देवतांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्वच कथा अतिशय रंजक आणि वैचित्र्यपूर्ण आहेत. या कथांमध्ये चित्रित केलेले स्त्री-मनाचे विविध अविष्कार आणि देव-देवतांचे गुंतागुंतीचे नातेसंबंध मानवी मनाशी जवळीक साधणारे आहेत. या अक्षयकथा दुर्गा भागवतांनी अत्यंत रसाळ आणि सुबोध शैलीत सांगितलेल्या आहेत. त्यांची भाषाशैली ही सर्व वयाच्या, सर्व थरांतील वाचकांशी सुसंवाद साधणारी आहे. या अक्षयकथांच्या अंतर्गत आम्ही प्रकाशित करीत असलेली पुस्तके खालीलप्रमाणे : पार्वती आणि कालिका • सरस्वती, सावित्री, अदिती, लक्ष्मी • सीता आणि रेणुका • मोहिनी, कन्याकुमारी, सुभद्रा

ओरिएंट लाँगमन

मुखपृष्ठ : बद्रीनारायण
सजावट : वसंत प्रधान

Durga Bhagwat Mohini, Kanyakumari, Subhadra (Marathi)
ISBN 0 86125 971 8